नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक ०५/०६/२०२४ (बुधवार) सकाळ**

## जबरी संभोग करून जिवानीशी ठार करण्याचा प्रयत्न करणाऱ्या आरोपीला कोर्टातुन शिक्षा

**पो.स्टे. उमरेड**:— फिर्यादी यांच्या रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन उमरेड येथे अप. क्र. ५८३/२०१८ कलम ३७६(१) ३७६(२) (जे) (आय) (एम) भादवि, ३०७ भादवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद झालेला होता.

यातील जखमी पिडीता ही गोकुल कोळसा खदान उमरेड येथे मागील दोन वर्षापासुन कामावर होती. दि. १४/०८/२०१८ चे १३/३० ते १४/३० वा. दरम्यान जखमी पिडीता ही महिलांसाठी तात्पुरता तयार करण्यात आलेला बाथरूम मध्ये बाथरूमसाठी गेली असता **आरोपी नामे— मामलेश कन्हैयालाल चक्रवर्ती, वय २० वर्ष रा. जयसिंग नगर देवास इंदोर (म.प्र.)** हा तिचे मागोमाग बाथरूम मध्ये जावुन तिचेवर जबरीने बलात्कार केला. जखमी पिडीताने विरोध केला असता आरोपीने बाजुचा दगड घेवुन जखमीच्या डोक्यावर आणि चेह—यावर दगडाने जिवे ठार मारण्याचे उददेशाने मारून पिडीतेला गंभीर जखमी केल्याने आरोपीविरूदध कलम ३७६(१), ३७६(२) (जे) (आय) (एम) भादवि ३०७ भादंवि प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला.

सदर प्रकरणाचे तपास श्रीमती पौर्णिमा तावरे मॅडम यांनी करून सदर प्रकरण न्याय प्रविष्ठाकरीता मा. डि. जे. ०६, श्री. जी. पी. देशमुख सो. कोर्टामध्ये सादर केले. आज दिनांक ०५/०६/२०२४ रोजी मा. डि. जे. ०६, श्री. जी. पी. देशमुख सो. यांनी वरील नमुद आरोपीला भादंवि कलम ३०७ अंतर्गत आजन्म कारावास व ५,००० रू द्रव्यदंड, दंड न भरल्यास १ महिना साधा कारावास. भादवि कलम ३७६(१), ३७६(२) (जे) (आय) (एम) भादवि मध्ये आजन्म कारावास, व ५००० रूपये द्रव्यदंड, दंड न भरल्यास ०१ महिना साधा कारावास अशी शिक्षा ठोठावली आहे.

सरकारचे वतीने एपीपी श्रीमती रश्मी खापर्डे मॅडम यांनी काम पाहीले. कोर्ट कामात पैरवी अंमलदार म्हणुन सफौ वनिता सावरकर पोस्टे उमरेड यांनी मदत केली आहे.

# जिवानीशी ठार करण्याचा प्रयत्न करणाऱ्या आरोपीला कोर्टातुन शिक्षा

**पो.स्टे. काटोल** :— फिर्यादी नामे— प्रभुदयाल शमदिन रागेड, वय ५८ वर्ष रा. कुर्तलापुर उत्तर प्रदेश ह. मु. सरस्वती नगर काटोल यांच्या रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन काटोल येथे अप. क्र. ७६१/२२ कलम ३०७ भादवी कायद्यान्वये गुन्हा नोंद झालेला होता.

यातील जखमी फिर्यादी व आरोपी नामे— रामा उर्फ रामराव ज्ञानेश्वर दोईजोडे, वय ५० वर्ष, रा. अण्णाभाउ साठे नगर काटोल हे चाय पिण्याकरीता हॉटेल वर गेले असता आरोपी सोबत असलेल्या कुत्र्याने एका अज्ञात मुलास चावा घेतला. त्यावरून फिर्यादीने आरोपीस हटकले तेव्हा आरोपीने जखमी फिर्यादीस शिवीगाळ केली. दिनांक १०/१०/२०२२ चे १७/०० वा. ते १७/३० वा दरम्यान जखमी फिर्यादी हा बाजारात गेला असता आरोपी तेथे येवुन ''तुने मुझे तब क्यो टोका''असे म्हणुन जिव घेण्याचा उददेशाने फिर्यादीच्या डाव्या कानावर व गळयावर चाकुने मारूण गंभीर जखमी केले.

सदर प्रकरणाचे तपास पोउपनि चौहाण पो. स्टे. काटोल यांनी करून सदर प्रकरण न्याय प्रविष्ठाकरीता मा. डी. जे. — ६ अली सा़े. कोर्टामध्ये सादर केले. आज दिनांक ०५/०६/२०२४ रोजी मा. डी. जे.— ६ अली सा़े. यांनी वरील नमुद आरोपीला कलम ३०७ भादवी मध्ये ३ वर्ष सश्रम कारावास व १०,०००/— रू दंड. दंड न भरल्यास ६ महिने साधा कारावास अशी शिक्षा ठोठावली आहे.

सरकारचे वतीने एपीपी साखरे सा़े. यांनी काम पाहीले. कोर्ट कामात पैरवी अंमलदार म्हणुन पोशि प्रमोद कोहळे पोस्टे काटोल यांनी मदत केली आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**